दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

रविवार पुरवणी २४ नोव्हेंबर २०२४

## अदानी आणि अमेरिकेतील लाचखोरी प्रकरण

संपादकीय

**गौतम अदानी यांचा अदानी समूह, जो भारतातील प्रमुख औद्योगिक समूहांपैकी एक आहे, सध्या अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. अमेरिकेतील न्यायालयाने $250 दशलक्षांच्या लाचखोरीचे आरोप लावले आहेत. या आरोपांमध्ये भारतीय सरकारी अधिकाऱ्यांना लाच देऊन महत्त्वाचे सौर ऊर्जा प्रकल्प मिळविण्याचा दावा आहे. या प्रकरणाचा फटका केवळ अदानी समूहालाच नाही, तर एलआयसीसारख्या भारतातील मोठ्या आर्थिक संस्थांनाही बसतोय.**

अमेरिकेतील न्यायालयाने दाखल केलेल्या आरोपपत्रानुसार, 2020 ते 2024 दरम्यान अदानी समूहाने भारतीय सरकारी अधिकाऱ्यांना लाच देऊन लाभदायक ऊर्जा प्रकल्पांचे करार मिळवले. या करारांमुळे अदानी ग्रीन एनर्जीला प्रचंड नफा झाला, परंतु हे करार गृहित धरण्यावर आधारित होते. या आरोपांच्या केंद्रस्थानी, अदानी समूहाने बनावट कागदपत्रांद्वारे अमेरिकी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा दावा करण्यात आला आहे.


अदानी समूहाची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारशी असलेली जवळीक नेहमीच वादग्रस्त ठरली आहे. या आरोपांमुळे भारतीय राजकारणात पुन्हा वाद पेटला आहे. विरोधी पक्षांनी अदानी समूहावर चौकशीची मागणी करत सरकारवर टीका केली आहे. ही प्रकरणे पंतप्रधान मोदींच्या सरकारच्या धोरणात्मक निर्णयांवर प्रश्नचिन्ह उभे करत आहेत.

याशिवाय, या प्रकरणाचा भारत-अमेरिका आर्थिक संबंधांवरही दूरगामी परिणाम होऊ शकतो. अमेरिकेत अदानी समूहाच्या गुंतवणुकीबाबत संशय निर्माण झाला आहे, ज्यामुळे या संबंधांत अडचणी येऊ शकतात.

### एलआयसीवरील परिणाम
भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी) ही अदानी समूहातील प्रमुख गुंतवणूकदार आहे. अदानी समूहावरील आरोपांमुळे एलआयसीच्या गुंतवणुकीचे मूल्य घसरले आहे. एलआयसीच्या गुंतवणुकीमुळे संस्था स्वतःवर मोठा आर्थिक दबाव अनुभवत आहे.

### शेअर बाजारातील नुकसान:
अदानी समूहाच्या कंपन्यांचे शेअर्स 10% नी घसरले आहेत, ज्याचा थेट परिणाम एलआयसीच्या गुंतवणुकीवर दिसून येतो. हे नुकसान मोठ्या प्रमाणावर पॉलिसीधारकांवर परिणाम करू शकते.

### विश्वासाचा अभाव:
एलआयसीसारख्या प्रमुख संस्थेने अशा विवादित समूहात मोठी गुंतवणूक का केली? या प्रश्नांमुळे ग्राहकांमध्ये आणि पॉलिसीधारकांमध्ये अस्वस्थता




निर्माण झाली आहे.

### आर्थिक पुनरावलोकनाची गरज:
एलआयसीला आपली गुंतवणूक धोरणे पुनरावलोकन करावी लागतील. अशा प्रकरणांमुळे भविष्यातील गुंतवणुकीत अधिक पारदर्शकता आणि जोखीम व्यवस्थापनावर भर देणे आवश्यक होईल.

### प्रकरणाची व्यापक परिणामकारकता
### आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव:
या प्रकरणामुळे अदानी समूहाच्या जागतिक प्रतिमेला धक्का बसला आहे. या समूहाने गेल्या काही वर्षांत जागतिक पातळीवर महत्त्वाकांक्षी गुंतवणूक केली आहे. परंतु, या आरोपांमुळे समूहाच्या प्रकल्पांवरील विश्वास कमी झाला आहे.

जर हे आरोप सिद्ध झाले, तर समूहाला आर्थिक दंड, भविष्यातील गुंतवणुकीवरील निर्बंध, आणि जागतिक बाजारपेठेत पत कमी होण्याचा धोका आहे.

### नैतिकता आणि व्यवस्थापन प्रश्न:

या प्रकरणाने उद्योग क्षेत्रातील नैतिकतेवर आणि पारदर्शक व्यवस्थापनावर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. प्रकल्प जिंकण्यासाठी लाचखोरी करणे आणि गुंतवणूकदारांची फसवणूक करणे हे गंभीर गुन्हे मानले जातात.

अदानी समूहावरील हे प्रकरण भारताच्या उद्योग क्षेत्रातील विश्वासार्हतेसाठी एक गंभीर आव्हान आहे. विशेषतः, एलआयसीसारख्या संस्थांवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. एलआयसीला आपली गुंतवणूक धोरणे आणि जोखीम व्यवस्थापन याबाबत कडक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

या प्रकरणाचा निकाल केवळ अदानी समूहाचाच नव्हे, तर भारताच्या एकूण आर्थिक वातावरणावर दीर्घकालीन परिणाम करू शकतो. नैतिकता आणि पारदर्शकतेच्या मार्गाने पुढे जाण्यासाठी भारताच्या उद्योग क्षेत्राला हा एक गंभीर धडा आहे.

अदानी समूहाचे भारतातील व्यवसाय देशाच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. ऊर्जा आणि पायाभूत सुविधांपासून अन्न व कृषीपर्यंत विविध क्षेत्रांमध्ये समूहाने मजबूत स्थान निर्माण केले आहे. मात्र, अनेक वादग्रस्त मुद्द्यांमुळे समूहाच्या व्यवसाय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. समूहाने पारदर्शकता आणि नैतिकतेवर अधिक भर देणे आवश्यक आहे.

अदानी समूह हा भारतातील एक आघाडीचा औद्योगिक समूह आहे, जो विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. 1988 मध्ये गौतम अदानी यांनी स्थापन केलेला हा समूह आता ऊर्जा, पायाभूत सुविधा, पोर्ट्स, खाणकाम, गॅस वितरण, आणि नवीकरणीय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये विस्तारला आहे.

### १. बंदरे आणि लॉजिस्टिक्स
अदानी समूह भारतातील सर्वांत मोठा खाजगी बंदर ऑपरेटर आहे. मुंद्रा पोर्ट हा देशातील सर्वांत मोठा पोर्ट असून, याशिवाय भारतभर समूहाच्या पोर्ट्स आहेत, जसे की कांडला, दहेज, आणि हजीरा. हे पोर्ट्स लॉजिस्टिक हब्ससाठी महत्त्वाचे मानले जातात.

### २. ऊर्जा आणि वीज
अदानी पॉवर ही भारतातील मोठ्या ऊर्जा उत्पादकांपैकी एक आहे. समूहाने देशातील ऊर्जा गरज पूर्ण करण्यासाठी कोळसा आधारित थर्मल प्रकल्प तसेच नवीकरणीय ऊर्जेमध्ये गुंतवणूक केली आहे.

- अदानी ग्रीन एनर्जी: सौर आणि वाऱ्याच्या ऊर्जेमध्ये विशेष कामगिरी.
- अदानी ट्रान्समिशन: वीज वितरणासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

### ३. खाणकाम आणि नैसर्गिक संसाधने
- अदानी समूह कोळसा खाणकाम आणि खाण पायाभूत सुविधांसाठी ओळखला जातो. समूहाच्या खाणी ऑस्ट्रेलियासह भारतातही मोठ्या प्रमाणावर आहेत. याशिवाय, कोळसा आयात आणि निर्यातीमध्ये अदानी समूह महत्त्वाची भूमिका बजावतो.

### ४. गॅस वितरण आणि तेल व्यवसाय
अदानी गॅस ही देशातील महत्त्वाची नैसर्गिक गॅस वितरण कंपनी आहे. शहरांमध्ये गॅस वितरण नेटवर्क विकसित करण्यासाठी समूहाने विशेष प्रकल्प राबवले आहेत.

### ५. अन्न व कृषि व्यवसाय
अदानी विल्मार ही खाद्यतेल, डाळी, आणि इतर अन्न पदार्थांच्या उत्पादनासाठी ओळखली जाते. फॉर्च्यून ही भारतातील आघाडीची खाद्यतेल ब्रँड अदानी विल्मारची मालकी आहे.

### ६. पायाभूत सुविधा आणि विमानतळ
अदानी समूह भारतातील विमानतळ क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहे. देशातील महत्त्वाचे विमानतळ जसे की मुंबई, अहमदाबाद, आणि लखनौ यांचे व्यवस्थापन अदानी समूहाकडे आहे.

(पान ८ वर)

# इलेक्शन आणि रिलेशन




## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

महाराष्ट्र विधासभा सार्वत्रिक निवडणुकीसाठीचे मतदान नुकतेच पार पडले. काही तुरळक अपवाद वगळता हे मतदान शांततेत पार पडले असेच म्हणावे लागेल. अगदी सहा महिन्यांपुर्वीच लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडल्याने तेव्हाचा एकंदरीत 'फिव्हर' निवळतो न निवळतो तोच आता विधानसभेसाठीची निवडणूक पार पडली. भारत हे लोकशाही शासनव्यवस्था असलेले एक मोठे राष्ट्र आहे. या देशातील लोकशाही जगभरात प्रसिद्ध आहे. त्यामुळेच येथील कोणत्याही निवडणुका संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतात. तसेही लोकशाही शासनव्यवस्थेचे 'निवडणुक' हे अविभाज्य अंग आहेच. लोकशाही अधिक सुदृढ व मजबूत होण्यासाठी निर्धारित काळात निवडणुका होणे, मात्र त्या निकोप व निर्धोक वातावरणात पार पडणे आवश्यक आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत सर्व राजकीय पक्ष, अनेक अपक्षदेखील आपापले नशीब अजमावण्याचा प्रयत्न करतात. यांपैकी काही समान विचारधारेचे असलेले मित्रपक्षदेखील अनेकदा निवडणुकीच्या रणांगणात परस्परांविरुद्ध उभे ठाकलेले पहावयास मिळतात. अनेकदा विचारधारा समान असली तरी काही 'तात्विक' मतभेद असतात. कधी कधी आंतरिक वादही निर्माण होतात. लोकप्रतिनिधी बनण्याची इच्छा आणि कधी कधी सत्तेच्या लालसेपोटी दोन किंवा त्याहून जास्त आघाड्या किंवा युत्या सत्तेसाठीच्या सारीपाटावर आपापले डाव मांडतात. अनेक पक्षांचे, उमेदवारांचे शेकडो, हजारो समर्थक, कार्यकर्ते तळागाळात पसरलेले असतात. निवडणुकीच्या रणधुमाळीत आपलाच नेता 'आमदार' म्हणून कसा योग्य व लायक उमेदवार आहे हे सिद्ध करण्यासाठी ते रात्रंदिन झटत असतात. पुढे याच भावनेतून आरोप-प्रत्यारोप, टीका-टिप्पण्या' घडत राहतात. एकंदरीत निवडणुकीचा 'माहौल ' निर्माण होतो. निवडणुकीचे वातावरण तापू लागते. सत्तेसेठीच्या या शर्यतीत आपण अजिबात मागे राहता कामा नये या भावनेतून, महत्वाकांक्षेतून अगदी दोघे सख्खे भाऊ, नवरा-बायको, बाप-मुलगा, काका-पुतण्या, बहीण-भाऊ वगैरे सारे एकमेकांविरुद्ध उभे ठाकलेले आपण पाहतो. अर्थातच अशा वातावरणात किंवा अशा प्रसंगी खरी परीक्षा असते ती त्यांच्या कार्यकर्त्यांची. कधी काळी हातात हात घालून, परस्परांचे बोट धरून प्रचारात उतरलेल्या अशा अनेक कार्यकर्त्यांवर आता एकमेकांच्या विरुद्ध रान उठवताना काळीज मोठे करावे लागते किंवा अधिक कठोर करावे लागते. कारण अशा प्रसंगांचा सामना करीत असताना त्यांचे परस्पर हितसंबंध, परस्पर नातेसंबंध बिघडण्याचा धोका अधिक असतो. खरेतर मतदान हे प्रत्येक नागरिकाचे आद्य व पवित्र कर्तव्य आहे. प्रत्येक नागरिक किंवा मतदारास त्या त्या निवडणुकीस उभे राहण्याचा अधिकार आहे. मात्र सध्याच्या काळाचा विचार करता एखाद्या सर्वसामान्य नागरिकाने निवडणुकीत उभे राहणे आणि निवडून येणे ही अशक्यप्राय गोष्ट आहे, हे वास्तव आहे. मग प्रत्येक मतदार एकेका उमेदवाराची 'कुंडली' डोळ्यांसमोर आणतो.

सध्या तर एकेका मतदारसंघात अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आपापले नशीब अजमावीत असतात. त्यांमधून आपल्या पसंतीचा उमेदवार निवडण्याचे व त्याला गुप्त मतदान करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक मतदारास भारतीय संविधानाने प्राप्त करून दिले आहे. मात्र असा एखादा उमेदवार डोळ्यांसमोर आणताना आपणासमोर अनेक गोष्टी उभ्या ठाकतात. वैयक्तिक परिचय, नातेसंबंध, कदाचित एखाद्या वेळेस काही आमिषांचाही भडीमार होतो. प्रत्येक उमेदवार स्वतःच्या विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो. त्यातूनच कधी कधी वादाचे, क्वचित प्रसंगी दंडेलशाहीचे प्रसंग उभे राहतात. अशा वेळेस एखाद्या विशिष्ट उमेदवाराच्या अनुषंगाने आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होते. आत्यंतिक चढाओढीच्या परिस्थितीत अनेक वेळेस नीतीमुल्ये बाजूला सारली जातात. नीतीमत्तेचा ज्या ठिकाणी ऱ्हास होतो, अशा ठिकाणी मग असंविधानिक प्रसंग घडतात.

कोणतीही निवडणूक, मग ती लोकसभेची असो, विधानसभेची वा अगदी ग्रामपंचायतीची! निवडणुक येते आणि जाते. निवडून आलेले पुढे आपल्या कर्तव्यात रममाण होतात. काहीजण तर अगदी

(पान ८ वर)

# डोक्यावर मारु नका सर

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल, मुख्याध्यापक,
शाळा शिडवणे नं. १
ता. कणकवली.



दादरा शाळेत असतानाची घटना आहे. शाळेत शिस्त असायला हवी हे सगळ्यांनाच मान्य असेल. त्यासाठी मुलांना थोडी शिक्षा करून वटणीवर आणण्याचे प्रयत्न होत असतात. मी सुध्दा लहानपणी शिक्षकांचा व पालकांचा मार खाल्ला आहे. पाढे पाठ नसले तर पाठीत धबके मिळाले आहेत. बाबांच्या काळात त्यांना रुळाने मारण्याची पद्धत होती असे म्हणतात. ' छडी लागे छम छम् विद्या येई घम घम् ' असे बालगीत त्यावरूनच आले असावे.

माझे लग्न झाल्यानंतर माझ्या बोटात सोन्याची अंगठी आली होती. मला दागिने घालण्याचा सोस नाही. पण लग्नात घातली. आता काढायची कशाला म्हणून घालूनच ठेवली. ती थोडी सैल होत होती म्हणून दोऱ्याने गुंडाळून तिचा व्यास कमी करून बोटात घट्ट बसवलेली. आता ती बोटातून सुटण्याची भिती नव्हती.

मुलांच्या अभ्यासाबाबत मी अजुनही काटेकोर आहे. दिलेला अभ्यास त्यांनी केलाच पाहिजे हा सर्वसाधारण दंडक असे. माझाही तसाच आग्रह नेहमीच असतो. कधी कधी कामाच्या व्यापात अभ्यास तपासणे होत नाही. मग नुसते पाहून सुध्दा प्रतिक्रिया देता येते. दैनंदिन अभ्यास करणे हे विद्यार्थ्यांचे जसे काम असते तसे दिलेला अभ्यास वेळच्या वेळी तपासून देणे हे शिक्षकाचे काम असते.

मी दररोज अभ्यास देत असे. अभ्यास न केलेल्या मुलांना पाठीवर प्रसाद मिळे. कधी हातावर काठीने हलकेच मारून अभ्यास न आणल्याबद्दल सौम्य शिक्षा देत असे. कितीही शिकवले तरी मुलांमध्ये फरक पडताना दिसत नव्हता. कारण मुले घरी अभ्यासच करत नव्हती. पालकच शिकलेले नव्हते. . त्यांना शिक्षणाबद्दल आस्था होती. पण तरीही ते मुलांकडे दुर्लक्ष करत होते. त्यामुळे माझी तळपायाची आग मस्तकात जाई. एवढे सांगूनही मुले अभ्यास करत नाहीत म्हणजे काय ? माझा संयम सुटत चालला होता. मी शिस्तीसाठी शिस्तीचे हत्यार वापरू लागलो. मुले शाळेत यायची बंद झाली

मग मुलांना घरी जाऊन शाळेत आणू लागलो. मुलांना आता शाळेत यावेच लागत होते. नाहीतर सर घरी येतात हे समजले. पालकांनीही " मारा तुम्ही सर , अभ्यासासाठी मारलेत तरी हरकत नाही " असे सांगितले. मग काय मला परवानगी मिळाली होती. मुलांनी अभ्यास करून चांगले शिक्षित व्हावे हा मूळ हेतू होता. तरी मार देणे हा काही त्यावरचा पर्याय नव्हता. पण नाही शिक्षा केली तर मुलांची पाटी नेहमी कोरीच राहताना दिसत होती. माझा संयम सुटला की मारणे आलेच. पण या शिक्षेची सवय होणे कधीही वाईटच. कारण मारल्याशिवाय अभ्यास येतच नाही असा समज दृढ होत जातो. पालक म्हणू लागले ते सर भारी आहेत. शिस्तीचे भोक्ते आहेत. मुलांना भरपूर मारून मस्त अभ्यास करून घेतात.

तीन चार दिवसानंतर आमच्या ग्रामशिक्षण समितीची सदस्या कोयना बाई झोरे उर्फ कोंडी आजी शाळेत आली. म्हणाली, " सर, तुम्ही मस्त शिकवता. तुमचा मुलांवर छान धाक आहे. तुम्ही आल्यापासून मुले अभ्यास करू लागली आहेत. पण सर , तुम्ही मुलांच्या डोक्यावर मारू नका. कारण तुमची अंगठी त्यांच्या डोक्यात बसते. एखाद्या मुलाच्या डोक्याला खोक पडली तर काय कराल ? "

मला तिचे येणे, जाणे, बोलणे अपेक्षित होते. पण तिने जे सांगितले ते अपेक्षितच नव्हते. ती जास्त वेळ थांबली नाही. लगेच निघूनही गेली. ती रागावलीही नाही. पण एका अशिक्षित आजीने मला एक चांगला धडा दिला होता. त्याच दिवशी मी ती सोन्याची अंगठी काढली. पुन्हा ती कधीच घातली नाही. मुलांना मारणे सोडून दिले.

मुलांना प्रेमाने जवळ घेतले. मुले मला घाबरेनाशी झाली. पण रोज शाळेत येऊ लागली. दररोज दिलेला अभ्यास वेळच्या

(पान ८ वर )

## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

**हे सदर काही अपरिहार्य कारणामुळे प्रसिद्ध करण्यात आले नाही आहे याची कृपया नोंद घ्यावी**

## एक शोध स्वतःचा: जीवनाचा नवा अध्याय

**विशाल नावाचा 35 वर्षांचा तरुण, एक मोठ्या कंपनीत उच्चपदावर काम करत होता. त्याच्या आयुष्याला बाहेरून पाहिलं तर ते खूप यशस्वी वाटत होतं—चांगलं वेतन, आलिशान घर, आणि प्रत्येकाला आकर्षित करणारं व्यक्तिमत्त्व. पण आतून मात्र विशाल बेचैन होता. त्याला सतत असं वाटत होतं की त्याचं आयुष्य फक्त कामापुरतंच मर्यादित राहिलंय, आणि त्याचा खरा आनंद कुठेतरी हरवलाय.**

### प्रारंभ: जीवनाचा उलगडा

एका दिवशी कामाच्या धकाधकीत विशालला अचानक थकवा जाणवला. त्याचं मन नको ते विचारांनी भरून गेलं होतं. तो स्वतःला विचारू लागला, "हेच का आयुष्य आहे? माझं खरं स्वप्न काय होतं?" या प्रश्नाचा शोध घेत तो आपल्या जुन्या मित्रांच्या गटात गेला. तिथे त्याचा मित्र अर्जुन, जो लेखक होता, म्हणाला, "विशाल, तू खूप मेहनत करतोस, पण कधी स्वतःसाठी जगतोस का?" अर्जुनने विशालला विचार करण्यासाठी प्रवृत्त केलं.

त्या रात्री विशालने ठरवलं, "माझं आयुष्य बदलायचंय." त्याने काही आठवडे सुट्टी घेतली आणि गडचिरोलीच्या एका लहानशा गावात जायचं ठरवलं. त्या ठिकाणी तो एका पर्यावरण प्रकल्पाशी जोडला गेला. शहराच्या गजबजाटापासून दूर, विशालने तिथे शुद्ध निसर्गाचा अनुभव घेतला आणि गावकऱ्यांच्या साध्या जीवनशैलीशी परिचय केला. त्याला तिथल्या माणसांमधली समाधानाची झलक पाहून अचंबित वाटलं.

गावात राहून विशालने अनेक नवीन गोष्टी केल्या. त्याने पहिल्यांदा झाडं लावली, पाणथळ भाग स्वच्छ केला, आणि मुलांना शिक्षणासाठी प्रेरित केलं. त्या मुलांच्या चमकत्या डोळ्यांत त्याला एक निरागसता दिसली, जी त्याने स्वतःच्या आयुष्यात कधी अनुभवली नव्हती. एका दिवशी, एका वृद्ध गावकऱ्याने त्याला सांगितलं, "पैशाने सगळं मिळतं असं नाही. आनंद हा माणसाच्या आत असतो. फक्त त्याला शोधायची कला हवी."

विशालच्या मनाला हे शब्द खोलवर भिडले. तो स्वतःशी विचार करू लागला की तो कधीपासून आपल्या करियरच्या मागे धावत होता, पण आपल्या मनाच्या गरजा लक्षात घेत नव्हता.

त्या काळात विशालला आठवलं की त्याला लहानपणी प्रवासाची आणि निसर्गाची खूप आवड होती. त्याला कॅमेरा हातात घेऊन जग फिरायचं होतं. पण करियरच्या चक्रात अडकून त्याने त्या स्वप्नाला बाजूला ठेवलं होतं. गावातील अनुभवाने त्याला पुन्हा त्याच्या जुन्या आवडीची आठवण करून दिली.

सुट्टी संपल्यानंतर विशाल शहरात परतला, पण यावेळी त्याचं आयुष्य वेगळं होतं. त्याने नोकरी सोडली आणि स्वतंत्र छायाचित्रकार (फोटोग्राफर) म्हणून काम करण्याचं ठरवलं. यासाठी सुरुवातीला कठीण परिस्थिती होती—स्थिर उत्पन्न नव्हतं, आणि अनेक वेळा त्याला आर्थिक अडचणींना सामोरं जावं लागलं. पण त्याला आपल्या कामात समाधान मिळत होतं.

विशालने काही वर्षांतच आपलं नाव प्रसिद्ध छायाचित्रकार म्हणून निर्माण केलं. त्याने आपल्या छायाचित्रांमधून निसर्गाचं सौंदर्य आणि लोकांच्या साध्या पण समृद्ध जीवनाचं चित्रण केलं. त्याचे फोटो देश-विदेशात प्रसिद्ध झाले आणि त्याने एका नवीन आनंदमय आयुष्याचा शोध लावला.

विशालची ही कहाणी फक्त यशाची नाही, तर एका व्यक्तीने स्वतःच्या आतला आनंद शोधण्याचा प्रवास आहे. त्याने दाखवून दिलं की बाह्य यशापेक्षा आत्मिक समाधान आणि स्वप्नांची पूर्तता महत्त्वाची आहे.

**त्याचं आयुष्य सांगतं की प्रत्येकाने थांबून विचार करायला हवा—"आपण जे करतोय, ते आपल्या मनापासून आवडतंय का?"**
**शिकवण: आयुष्य फक्त मिळवणं नाही, तर आनंदाने जगणं हाच त्याचा खरा अर्थ आहे**

**विनीत परांजपे**
**पुणे**



## जयश्री गडकर: मराठी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकळा



### चित्रजगत


**श्रीराम शेटये.**
**नालासोपारा**

**जयश्री गडकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या अभिनयाने 1950-1970 च्या दशकात संपूर्ण मराठी सिनेसृष्टी गाजवली. 21 फेब्रुवारी 1942 रोजी जन्मलेल्या जयश्री गडकर यांनी आपल्या नैसर्गिक अभिनय कौशल्याने आणि कलेच्या ओढीने रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.**

जयश्री गडकर यांची कारकीर्द 1950 आणि 1960 च्या दशकात झळकली, ज्यामुळे त्या मराठी चित्रपटसृष्टीतील "पहिली सुपरस्टार" म्हणून ओळखल्या जातात.

जयश्री गडकर यांचा प्रवास एका साध्या आणि सामान्य कुटुंबातून सुरू झाला. त्यांनी "जगाच्या पाठीवर" या चित्रपटाद्वारे अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यांचा अभिनय सहज, सोपा आणि प्रेक्षकांशी जोडणारा होता. त्यांनी एकामागोमाग एक हिट चित्रपट देत मराठी सिनेसृष्टीवर आपला ठसा उमटवला.

"सांगते ऐका," "मोहिटींच्या राह्या," "पिंजरा" यांसारख्या चित्रपटांमधील त्यांची कामगिरी उल्लेखनीय होती. जयश्री गडकर या केवळ एक अभिनेत्री नव्हत्या; त्या विविध भूमिका साकारणाऱ्या कलाकार होत्या. पौराणिक चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेली सीता, दमयंती, आणि रुक्मिणी यांसारख्या भूमिका त्यांचं विशेष योगदान अधोरेखित करतात.



जयश्री गडकर यांच्या कारकिर्दीतील एक ठळक पैलू म्हणजे पौराणिक चित्रपटांमधील भूमिका. त्यांनी रामायण आणि महाभारतावर आधारित चित्रपटांमध्ये सीता आणि दमयंतीसारख्या भूमिकांना जीवन दिले. त्यांच्या शांत, संयमी आणि प्रभावी अभिनयाने त्या भूमिकांना अमर केलं. या चित्रपटांमुळे त्या पिढ्या न् पिढ्यांसाठी आदर्श अभिनेत्री बनल्या.

सिनेमाच्या पडद्यावर गाजवल्यानंतर जयश्री गडकर यांनी नाटक क्षेत्रातही पदार्पण केलं. मराठी नाटकांमधून त्यांनी आपलं कौशल्य दाखवत प्रेक्षकांना प्रभावित केलं. त्यांची भाषेवरची पकड आणि संवादफेक या त्यांच्या प्रमुख ताकदी होत्या.

जयश्री गडकर यांचं वैयक्तिक आयुष्यही अतिशय प्रेरणादायी होतं. त्यांचे पती बाल धुरी हे देखील नामांकित अभिनेते होते. त्यांच्या सहजीवनात दोघांनी अनेक प्रकल्पांवर काम केले, ज्यामुळे त्यांची जोडी मराठी सिनेसृष्टीतील एक आदर्श जोडी म्हणून ओळखली गेली.

29 ऑगस्ट 2008 रोजी जयश्री गडकर यांचं निधन झालं. मात्र, त्यांची कलाकृती आणि योगदान आजही मराठी संस्कृतीला प्रेरणा देत आहे. त्यांनी मराठी सिनेसृष्टीला वैविध्यपूर्ण योगदान दिलं, ज्यामुळे त्या आजही प्रेक्षकांच्या हृदयात जिवंत आहेत.

**जयश्री गडकर यांचं जीवन म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीच्या एका सुवर्णयुगाची साक्ष आहे. त्यांच्या कार्यातून मिळालेली शिकवण पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरते.**

## अध्यात्म

# ग्रहांकित रोग व आजार भाग-२



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

**(मागील भागावरून पुढे..)**

**मागील भागात आपण सूर्य आणि त्याच्याशी संबंधित आजार यांबाबत अल्पांशाने माहिती घेतली. पुढे आपण चंद्रासंदर्भात माहिती घेवुयात.**

' चंद्र ' : अन्य ग्रह सूर्याभोवती सदैव प्रदक्षिणा करीत असतात मात्र चंद्र हा पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करीत असतो म्हणून चंद्राला खगोलशास्त्रात उपग्रह म्हटले आहे. ज्योतिषशास्त्रात चंद्राला ग्रह म्हणून महत्त्व दिले गेले आहे. जन्मपत्रिकेनुसार फलित वर्तवण्यासाठी पाश्चिमात्य ज्योतिषशास्त्रात व्यक्तीच्या जन्मकुंडलीत ' सूर्य ' ज्या राशीत असतो ती त्या व्यक्तीची जन्मराशी मानली जाते तर भारतीय ज्योतिषशास्त्रात व्यक्तीच्या जन्मकुंडलीत ' चंद्र ' ज्या राशीत असतो ती त्या व्यक्तीची जन्मराशी मानली जाते. खगोलशास्त्रात चंद्राला पृथ्वीचा उपग्रह जरी मानला गेला असला तरी चंद्र हा पृथ्वीच्या अतिशय जवळ असल्याने एखाद्या ग्रहाप्रमाणे पृथ्वीवर प्रभाव पाडतो व त्याचे परिणाम पृथ्वीवरील सजीव व निर्जीवांवर होत असतात.

चंद्र हा ' मनाचा ' कारक आहे. कल्पकता, मानसिक ताण तणाव, मानस सौख्य, शांतता, शितलता, प्रवाही द्रव्ये, पाणी , समुद्र, सरोवरे, लेखक, कवी, साहित्यिकांची कल्पकता, रूपके, उपमा, मातृत्व माया वगैरेंशी चंद्र संबंधित आहे.

पुराणात ब्रह्मदेवाचा पुत्र अत्री यांच्या नेत्रजलापासून चंद्राची उत्पत्ती झाल्यामुळे चंद्राचा उल्लेख ' आत्रेय ' असा आहे. चंद्राला अनसूयेचा पुत्र आणि श्रीदत्तात्रेयाचा बंधू म्हणूनही ओळखले जाते.

चंद्राबाबत वैज्ञानिकांनी केलेल्या संशोधनानुसार चंद्रावर धूळ आणि पर्वत यांनी व्यापलेली जमीन आहे. खगोलशास्त्रानुसार चंद्र हा पृथ्वीपासून वेगळा झालेला पृथ्वीचा अंशात्मक भाग आहे. सुमारे २,१६३ व्यास असलेल्या चंद्राचे पृथ्वीपासूनचे अंतर सुमारे २,३८००० मैल आहे. साधारणतः साडेसत्तावीस दिवसात तो एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करतो. चंद्र हा स्वप्रकाशित नसून सूर्यप्रकाशित आहे. पौर्णिमेला चंद्राच्या पृथ्वीकडील अर्धगोलावर सूर्याची सर्वत्र प्रकाशकिरणे पडल्यामुळे पृथ्वीवरून चंद्राचा पूर्ण वर्तुळाकार भाग (पृथ्वीकडील अर्धगोलाकार) प्रकाशित दिसतो.

अमावास्येला सूर्य आणि पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र आल्यामुळे पृथ्वीकडील चंद्राचा पूर्ण वर्तुळाकार भाग (चंद्राचा पृथ्वीकडील अर्धगोल) पूर्णतः अंधारमय होऊन दिसेनासा होतो. यावेळी चंद्र सूर्याच्या बाजूने अर्धगोलाकार प्रकाशित असतो हे समजण्या, उमाजण्यासारखे निश्चितच आहे. चंद्राच्या पृथ्वीभोवतीच्या परिभ्रमणामुळे निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या अवस्थांमुळे तिथींची गणना, सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण तसेच समुद्रात भरती व ओहोटी इत्यादी होत असतात.

ज्योतिषशास्त्रात चंद्राला ' कर्क ' राशीचा स्वामी मानले गेले आहे. व्यक्तीचे मन, अंतःकरण, मानसिक स्थिती, कल्पनाशक्ती, विनम्रता, दयाळूपणा, मायाळूपणा, कोमलता, करुणा यांचे कार्यकत्व चंद्राकडे आहे. मानवी शरीरात गळ्यापासून हृदयापर्यंत, गर्भाशय, अंडकोष यांवर चंद्राचा अंमल असतो. कर्क राशीत चंद्र असता जन्मलेल्या व्यक्तीवर अर्थात कर्क राशीच्या व्यक्तीवर चंद्राचा प्रभाव अधिक प्रमाणात असतो. कर्क राशीतला चंद्र जन्मकुंडलीत बलवान असेल आणि कुंडलीतील शुभ स्थानात असेल तर व्यक्ती कलाकार, प्रणयी, सुंदर, कवी, रसिक, साहित्यकार आणि उदार स्वभावाची आढळते.




चंद्राच्या अशुभ ग्रहांकित प्रभावाने व्यक्ती आळशी, नेत्रविकारी, पांडुरोगी, जलविकारी, कफविकारी असल्याचे आढळून येते. चंद्राच्या आजूबात वाणी पडसे, मानसिक विकार, शंका, कुशंका, संशय, स्त्रियांमधील संसर्गजन्य रोग उद्भवतात असे आढळून येते. खोकला, अनियमित मासिक पाळी, मानसिक चिंता, कल्पित अथवा अकल्पित भीती, आकलन न होणाऱ्या कारणाने उद्भवणारा अनपेक्षित ताणतणाव, आमवात, लघवीमधील जळजळ, पित्तखडा, विषाणू ज्वर, सर्दी-पडसे हे विकार कधी कधी चंद्र जन्म पत्रिकेनुसार अशुभस्थानातून भ्रमण करीत असल्याचे सुचित करतात. जन्मपत्रिकेतील क्षीण चंद्रामुळे कॅल्शियमसंबंधी विकारांची पीडा संभवते. ज्योतिषशास्त्रात चंद्रावरून स्त्रीच्या मासिक पाळीचा विचार केला जातो. फलित झालेल्या गर्भाधानाच्या वेळी चंद्र ज्या नक्षत्रात असतो त्या नक्षत्रावरून प्रसूतीच्या कालावधीचा अंदाज घेता येतो.

चंद्र गतिशील, चंचल, गौरवर्णाचा, सत्वगुणी, गोडवाणीचा, वर्षा ऋतूशी संबंधित व सुंदर डोळ्यांचा स्वामी आहे. अंकशास्त्रात सूर्य 1 अंकाचा स्वामी आहे तर चंद्र २ या अंकाचा स्वामी आहे.

चंद्राशी मंगळाचा, राहूचा, केतूचा अशुभ योग अपघात, आत्मघात (आत्महत्या), शस्त्रद्वारे घात, पीडा किंवा हत्या यांचे तसेच पाण्याच्या प्रादुर्भावातून उद्भवणाऱ्या सांसर्गिक आजारांचे कधीकधी अनिष्ट वो ग्रहदशेत कारक बनून जातात.

**(उर्वरित पुढील भागात..)**

---

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

# दिवाळी अशीही

प्रज्योत ने लॅपटॉप बंद केला. डोळ्यावरून हात फिरवले. घड्याळात पाहिलं सकाळचे चार वाजलेत. शेजारच्या अपार्टमेंट मधून धडाड धुडुम फटाक्यांचे आवाज येत होते. तिच्या अंतरमनात कळ उठली. सगळीकडे दिवाळीचा लखलखाट, रोषणाई, गोड तिखट फराळांची लयलूट आणि आपण मात्र हया चार भिंतीत चिणल्या गेलो आहोत. आपल्या मनात दिवाळी उमटत नाही. गेल्या दोन वर्षापासून त्याला आपण काय करणार? बेडरूम मध्ये आडवी होताना मन जड झाले आणि आठवलं तिला...

दोन वर्षांपूर्वी तिचा आणि प्रभासचा घट्टफोट झाला. हया परदेशीं स्वतः च्या नावावर एवढेमोठे कर्ज घेऊन ह्या अपार्टमेंट मध्ये घर घेतले. प्रभास ने दोघांच्या नावाने. आपल्याला आपल्या नकळत ह्यात गोवले आणि आता स्वतः मात्र नामानिराळा झाला. झक्कत तिला दिवसरात्र काम करावं लागतं. मनापासून सण साजरे करायला तिचा उत्साह निघूनच गेला होता. तिच्या मानी मनाला भारतात परत जाऊन कोर्ट कचेरी करून आपली आणि घरच्या माणसांची मानहानी, बदनामी करणे पटत नव्हते. घरच्याना ह्याबद्दल काहीही न सांगण्याचा निर्णय घेतला आणि आता दिवस रात्र कामं करतेय.

सकाळी सात ला तिची मेड चंपाबेन आली. खरंतर मेडसुद्धा ठेवु नये असं वाटत असे तिला. पण मग दोनवेळा बाहेरचं मागवून खाणं आणि आजारी पडणं ह्यापेक्षा ही मैत्रिणीने दिलेली भारतातून आणलेली चंपा अवघ्या अर्ध्या तासात आठ फुलके, भाजी आणि साफसफाई करून जाते. त्यामुळे बराच खर्च वाचत असे.



तिचे अस्तव्यस्त अपार्टमेंट सफाई करताना मनात बडबडत राहिली. "एवढे पैसे कमावून काय फायदा?साधं एक गोड पदार्थ करत नाही. हया मॅडम सतत काम अन काम. शनिवार रविवार क्वचित बाहेर जातात.पण सणाला कुठेच जात नाहीत की कोणी येत नाही. . आमच्या भावनगर ला दिवाळीची ही लगबग, रोषणाई, आतशबाजी, मिठाया आणि भेटवस्तू देणं घेणं... हया देशात ख्रिसमस जसा तशी आमच्याकडे दिवाळी.

पण हया मॅडम ला कसलंच काही नाही. त्या पेक्षा मी गरीब असूनही बरी म्हणायची. सकाळीच अपार्टमेंट सोडून घरोघरी मेडचं काम करते. रात्री गॅलरीत दिवे लावते. भावनगर ला व्हिडीओ कॉल लावते आणि तिथला सण बघत बघत ईकडे चकल्या, शंकरपाळी खाते. शेवटी आम्ही गरीब माणसं कमावण्या साठी परदेशीं आलो पण मनात दिवाळी घेऊन वागतो. नसेल आमच्याकडे खूप पैसा, जो कमावतो तो गावाला पाठवतो. कारण आमच्या पैशावर तिकडे चार घास लेकरांना मिळतात. शेवटी ते खूष तर आपण खूष. तीच आपली दिवाळी."

प्रज्योत चे डोळे बंद होते पण कान उघडे होते. तिच्या मनात आलं चंपा म्हणते ते खरं असलं तरी मनाची दिवाळी महत्वाची. कधीकधी आईबाबांचा राग येतो. त्यांनाच परदेशीं जावई पाहिजे होता. आपल्या आणि दीदीच्या मनात तिचा मावस दीर समीर होता. पण बाबांनी प्रभासच स्थळ आलं आणि मागचापुढचा विचार न करता लग्न ठरवलं. प्रभास केवळ लग्न करण्यासाठी 1 महिना रजेवर आला होता .30दिवसांत सतरा मुली पाहून आपल्याला निवडलं ह्याचंच बाबांना कौतुक होतं. पण त्याने आपल्याला का निवडलं? आपला शैक्षणिक पोर्ट फोलिओ,चांगली पोस्ट. ह्यामुळे त्याने आपल्याला होकार दिला. ह्याबद्दल इकडे आल्यावर सहा महिन्यांनी आपल्याला समजलं. नशीब आपण लग्नाच्या आधीच

(पान ८ वर)

# पर्यावरणप्रिय भूत

**शाहू राणे**
**फोन्डा सिंधुदुर्ग**

कोकणातील एका छोट्याशा गावात एक प्राचीन वाडा होता. हा वाडा जिथे तिथे घनदाट झाडांनी वेढलेला होता. तिथे गावातील लोक कधीही न जात. कारण, तिथे एका भूताचा वास असल्याचं म्हणत. पण या भूताचा स्वभाव वेगळा होता. लोकांना त्रास देण्याऐवजी, ते लोकांना मदत करत असे. त्याचं नाव होतं "बाबा भूत."

बाबा भूत कोणालाही उगाच त्रास देत नसे. पण गेल्या काही वर्षांत कोकणात मोठ्या प्रमाणावर झाडं तोडली जाऊ लागली. मोठ्या इमारती, रस्ते आणि प्रकल्प उभारण्यासाठी जंगलांचा ऱ्हास झाला. बाबा भूत हे सगळं पाहत असायचं. त्यांना झाडं तोडण्याची क्रूरता सहन होत नव्हती. कारण ही झाडं त्यांच्या आयुष्याशी जोडलेली होती. त्याच झाडांच्या सावलीत त्यांच्या पूर्वजांची समाधी होती.

जरी बाबा भूत रागावलेले असले, तरी ते गावकऱ्यांना नेहमी मदत करत. गावातल्या लहान मुलांनी हरवलेली वस्तू शोधून देणं, कष्टकरी लोकांना पाण्याच्या ठिकाणं दाखवणं, आणि संकटात सापडलेल्या माणसांना मदत करणं, हे त्यांचं नेहमीचं काम होतं. त्यांच्या गूढ अस्तित्वामुळे गावातल्या लोकांना त्यांच्याबद्दल आदर होता.

एका रात्री बाबा भूत खूप दुःखी झाले. त्यांनी पाहिलं की गावातल्या नद्या सुकू लागल्या आहेत, पक्ष्यांनी कोकण सोडायला सुरुवात केली आहे, आणि शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी कमी पडत आहे. तेव्हा त्यांनी ठरवलं की, गावकऱ्यांना या विनाशाचा अर्थ समजावून सांगायचा.

त्यांनी एका वयोवृद्ध माणसाच्या स्वप्नात प्रकट होऊन सांगितलं, "तुमच्या झाडांनी गावाला जीवन दिलं आहे. झाडं कापून तुम्ही स्वतःचं नुकसान करताय. पाऊस कमी होईल, जमीन कोरडी पडेल, आणि तुमची पिढी संकटात सापडेल."

त्या माणसाने स्वप्नातील अनुभव गावात सर्वांना सांगितला. बाबा भूताच्या संदेशामुळे लोकांच्या डोळ्यातलं पाणी आलं. त्यांनी झाडं कापण्याचा वेग कमी केला आणि नवीन झाडं लावायला सुरुवात केली. बाबा भूत गावकऱ्यांच्या निर्णयाने खूश झाले.

गावकऱ्यांनी एक संकल्प केला की, "झाडं वाचवणं म्हणजे भविष्यासाठी आधार ठेवणं." बाबा भूत अजूनही त्या वाड्यात आहेत, पण आता ते आनंदी आहेत. ते गावकऱ्यांना मार्गदर्शन करत राहतात.

ही गोष्ट आपल्याला शिकवते की, निसर्गाशी सुसंवाद राखला पाहिजे. झाडं, नद्या, आणि पर्यावरण यांचा ऱ्हास थांबवूनच आपण आपल्या भविष्याला सुरक्षित करू शकतो. बाबा भूताचं जीवन म्हणजे पर्यावरण रक्षणाचं प्रतीक आहे.



# सरायचा सुख

## मालवणी बोली



**वयल्यांचा कवग्या,**
**मालवण- सिंधुदुर्ग.**

सकाळचो चायच्या भांड्यांचो खटारो आटपून मी आणि सासुबाय होवऱ्यात येवन बसलव. आज सासुबाय लय खुश व्हती. ती होवऱ्यात भिंतीक वडगान बसली. 'अगो, आज मिया लय खुश आसय. काल आपण सगळा भात मोजलव. दोन खंडी भात! माका वाटता, गेल्या धा पंधरा वरसांतला ह्या सगळ्यात जास्त भात भरात. शिवाय नाचणी पंधरा मण. माका ना लय बरा वाटला. अशे भातांचे राशी आम्ही पुर्वी बघायचाव. कणगे भरून भात, मुडये भरून बियाचा भात, माजघरातला धान्याचा कोठार तर सदीचा भरलेलाच दिसायचा. असा धन धान्यान भरलला घर दिसणा म्हणजे खरा सुख गो बाय!'

आताच्या पोरांक विचारा एक मण भात म्हणजे किती? एक खंडीभर भात म्हणजे किती? काय्येक कळाच नाय. पण आमचा बालपण बाय असाच मणभर, खंडीभर मोजण्यात गेला. तेव्हाचा काय सांगू बाय, उभ्या गावात खयचा भराड, भाटी, खजिनो तुमका पडीक दिसत नाय व्हतो. पावसाळ्यात काय नि गिमात काय, मळेच्या मळे नुसते हिरवेगार दिसायचे. पावसाळ्यात भरडा हळव्या भातान, नाचणीच्या कासान भरान जायची.

नाचणीच्या शेतात मेरेंनी पोसावलली वरी, तीळयेंचे फुललले रांगे लांबसून मस्त दिसायचे. ह्या तर सोडा, तेव्हाची लोका ना, डोंगरावर मळयेत कास कास काढायची. डोंगर उतारावर नाचणी, वरी, तीळ, कुळीथ, भयमुगाची शेती फुलायची. तेव्हा घरात असा खंडीभर भात, नाचणी, भयमुगाचे शेंगांनी भरलला घर दिसणा म्हणजे खरी श्रीमंती व्हती.

दररोज सकाळी उठून तेव्हा लोक शेताची वाट धरायचे. दिसभर शेतात राबायचे. सांचे मोठ्या समाधानान घरात यायचे. तेव्हाच्या काळात असा धनधान्य म्हणजेच लोकांचो बँक बॅलन्स व्हतो. माका वाटता सहसा कोण बँकेत जायत नाय व्हतो. बँक म्हणजेच काय ताच बऱ्याच लोकांक म्हायत नाय व्हता. कोणी तरी आपले मुंबैवाल्यानी पाठवलेल्या मनी ऑर्डरीतले काटकसरीन साठवलेले पैसे गावातल्या पोष्टात ठेवायचे. गावातली एखादी शिकलली सवरलली बाई चार बायकांक गोळा करून बायकांची पोष्टात आर डी खाती उघडायची. कधी पाच वरसान तर कधी



सात वरसान आर डी चे पैसे मिळायचे. मग त्या पैशातून चार भांडी घे, एखादा कपाट घे,पाठच्या पडयेचे वाशे बदल, खय काय कर अशी बारकी सारखी कामा व्हायची.

पण अशा पैशांपेक्षा शेतीभातीतच माणसांचो जीव अधिक रमायचो. सरायचा भात, नाचणी, भयमूग गुंडाळतना लोकांची दमछाक व्हायची. तेव्हाची माणसा आपली शेती गुंडाळून झाली की शेजारी पाजाऱ्यांक मदत करायची. भातांची झोडणी, मळणी सगळी कामा अशी एकमेकांच्या हातभारान तडीक जायची. सरायच्या काळात कोकणातल्या शेतकऱ्याक लय बरा वाटायचा. पावसाळ्यात उभो पावस अंगावर घेवन राब राब राबलल्याचा सार्थक झाल्यासारख्या वाटायचा. वळयत असे धान्यान भरलले आणि एकावर एक रचून ठेवलले गोणते किंवा पोती बघून घरातली म्हातारी कोतारी माणसा म्होवरान जायची. आवश्यक भात, नाचणी, वरी, भयमूग बियाक ठेवन मगे उरलला भात सडून आणा, नाचणी सडून आणा, भयमुगाचा तेल काढून आणा अशी कामा सुरु व्हायची. वर्षभर लागणारा सगळा धान्य, कडधान्य ह्या असा आपल्याच शेतात पिकलला असायचा. थोडोफार भाजीपालो सोडलो तर भायरचा, विकतचा, बाजारचा असा काय नव्हताच. घरात पिकलेल्या धान्यातच तेव्हाची माणसा सुखी आणि समाधानी व्हती.

आज कोणाक सराय म्हणजे काय विचारा, किती जणांक धड सांगूक येता बघा. आज गावातल्या रेशन दुकानात बराचसा धान्य मोफत मिळता, स्वस्तात मिळता. बाजारात तर म्हणशात तो जिन्नस, वस्तू मिळता. मगे कोण कशाक शेतीच्या फंदात पडता, गेल्या काही वर्षांपासून कोकणातल्या लोकांनी शेतीकडे पाठ फिरवल्यातच जमा आसा. असा फुकट धान्य मिळत असताना शेतात, पावसात राबाची कोणाची तयारी नाय. त्यामुळेच आजच्या पोराटोरांक सराय म्हणजे काय? सराय कशाक म्हणतत, काय्येक म्हायत नाय. आमचा बालपण, तरुणपण आपला बरा

**(पान ८ वर)**

# सरकारी योजना/नोकरी

## शैक्षणिक कर्ज योजना

**योजनेचा प्रकार**

केंद्र शासनाच्या योजना राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी.), नवी दिल्ली यांच्या योजना

**योजनेचा उद्देश**

अनूसुचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाजप्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी महामंडळामार्फत योजना राबविण्यात येतात.

**योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नांव**

अनुसूचित जातीतील चर्मकार समाज.

**योजनेच्या प्रमुख अटी**

- अर्जदार हा अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाचा असावा.
- अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
- अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षांपर्यंत असावे.
- अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव त्याला असावा.
- 

( अ) अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागासाठी रु.९८०००/ व शहरी भागासाठी रु.१२००००/ पर्यंत असावे.

- (ब) राज्य शासन पुरस्कृत योजनांसाठी शहरी व ग्रामीण भागातील उत्पन्न मर्यादा रु.१०००००/ पर्यंत असावे.
- जातीचा व उत्पन्नाचा दाखला तहसिलदार किंवा तत्सम सक्षम प्राधिकायाने दिलेला असावा.
- अर्जदाराने या महामंडळाकडून अथवा इतर कोणत्याही शासकीय उपक्रमाकडून आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्ती अर्जदारावर बंधनकारक राहतील.

**दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप**

एनएसएफडीसी नवी दिल्ली यांच्या कर्ज योजने अंतर्गत सन २००१ या वर्षापासून शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत शैक्षणिक कर्ज मर्यादर देशात शिक्षणसाठी रु.१० लाख व परदेशासाठी रु.२० लाख इतकी आहे. या कर्जावर ४ टक्के व्याजदर आकारण्यात येतो.

**अर्ज करण्याची पध्दत**

- अर्जाचा नमुना महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात विनाशुल्क स्वरुपात उपलब्ध असेल.
- अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज भरुन संपूर्ण कागदपत्रांसह जिल्हा कार्यालयात अर्ज सादर करावयाचा आहे.

**योजनेची वर्गवारी**

शैक्षणिक

**संपर्क कार्यालयाचे नांव**

जिल्हा कार्यालय



## सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

**योजनेचे नाव**

**इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये शिकणा-या विजाभज / विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.**

**योजनेचा प्रकार**

राज्यस्तरीय योजना

**योजनेची वर्गवारी**

शैक्षणिक

**योजनेचा उद्देश.**

शासन निर्णय दिनांक 12 जानेवारी, 1996 अन्वये विजाभज विद्यार्थीनीं करिता व शासन निर्णय दिनांक 29 ऑक्टोबर, 1996 पासून विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थीनींना सुध्दा लागू करण्यांत आली आहे. सदरहू प्रवर्गाच्या विद्यार्थीनींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव**

विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग.

**योजनेच्या प्रमुख अटी**

- **विद्यार्थीनी विजाभज / विमाप्र या प्रवर्गातील असावी.**
- **विद्यार्थीनी इ. 5 वी ते 7 वी मध्ये शिकणारी असावी.**
- **विद्यार्थीनी ही शासन मान्य शाळेत नियमित शिकणारी असावी.**

**दिल्या जाणा-या लाभाचे स्वरुप**


प्रति विद्यार्थीनीस दरमाह रुपये 60/- याप्रमाणे 10 महिन्या करीता रु.600/- शिष्यवृत्तीची रक्कम संबंधीत लाभार्थ्यांस अदा केली जाते.

**अर्ज करण्याची पध्दत**

- **सदर योजनेचे संगणकीकरण झालेले असून**
- **ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**
- **संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी या वेबसाईटवर या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थिनींचे अर्ज / माहिती भरावी.**
- **संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सादर करावी.**

**संपर्क कार्यालयाचे नांव**

- **संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.**
- **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ उपनगर.**
- **संबंधित शाळांचे मुख्याध्यापक.**



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# महाराज सफारीत कसे ?

विद्यार्थी असल्या पासून मी कविता वाचन, गायन गायनपार्टी, जलसे, पथनाट्य, असे कार्यक्रम केले आहेत. गेल्या पस्तीस वर्षात अशा अनेक कार्यक्रमांच्या, अनेकांच्या सहवासातील अनेक आठवणी आहेत. त्यातीलच ही एक कायम स्मरणात राहिलेली आठवण.

महाराज सफारीत कसे ? हा प्रश्न बिलकुल चुकीचा नाहीच कारण महाराज म्हटलं की डोळ्यासमोर एक प्रतिमा येते .दाढी मिशा वाढलेल्या ,वारकरी ,टाळकरी असेल तर सदरा लेंगा ,धोतर ,कुडता ,डोक्यावर पांढरी टोपी किंवा फेटा, मुंडासे ,गळ्यात रुद्राक्ष माळा, कपाळी भला मोठा टीळा, उघडेबंब असले तर अंगाला भस्म अस काहीतरी रूप असेल ना !ही मनात संकल्पना . पण सफारी घालून हे महाराज आहेत असं म्हटलं तर काहीतरी घोळ आहे किंवा कुणी सांगितलं तरी त्यावर विश्वास बसणार नाहीच.

पूर्वी राजाला महाराज म्हणत ते भरजरी वस्त्रानिशी असत. गुजराती मारवाडी समाजात आचारी व्यक्तीला आदराने महाराज म्हणतात. यातले काही एक नसतांना एखाद्याला हे "महाराज आहेत आणि ते ही सफारीत त्यामुळं समोरची व्यक्ती काहीकाळ क्षणभर गोंधळून जाणार हे त्रिवार सत्य. असा प्रसंग माझ्या बाबतीत घडला आणि तो शासकीय विश्रामग्रुहात. अन्य कुठं घडला असता तर काही वाटलं नसत पण ज्ञानेश्वरांच्या आळंदीत. माझी ओळख हे महाराज म्हणून दिली गेली. नशीब सरकारी आदेशाची प्रत आणि ओळखपत्र ,निमंत्रणपत्र ते सुद्दा राज्याच्या कॅबिनेट मंत्र्यांचे, जिल्हा मुख्यकार्यांकारी अधिकारी यांच्या सहीचे होते म्हणून नाहीतर तोतया महाराज म्हणून आळंदीत पोलीस स्टेशनला जाव लागले असत. यातली गंमत सोडा पण या सर्वच प्रकरणात सरकारी रेस्टहाऊसचा कर्मचारी मात्र दुसऱ्या दिवसापर्यंत संशयाने पहात होता. कदाचित बिचारा रात्रभर झोपलाही नसेल.

त्याच काय झाल केंद्र आणि राज्य शासन यांनी हागणदारीमुक्त गाव निर्मळग्राम, राष्ट्रसंत गाडगेबाबा संत तुकडोजी महाराज यांचे नावे स्वच्छता अभियान राबविली. या दोन्हीही संत महात्यांनी भजन, किर्तन मधून लोकप्रबोधन, जागृती केली. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन शासन प्रशासन यांनी ना ना युक्त्या, उपक्रम राबवत अभियान यशस्वीपणे पूर्ण करण्याचा संकल्प केला. ऑक्टोबर 2010साली तत्कालीन पाणी पुरवठामंत्री असणारे प्रा. लक्ष्मणजी ढोबळे यांनी एक संकल्पना राबविली. या कामी कोट्यवधी रुपये जाहिरात प्रबोधन साठी खर्च करत आहोतच मग आपण यात राज्यातील किर्तनकार याचं सहकार्य घेतलं त्यांची कार्यशाळा घेतली, शासनाचा उद्देश ध्येय स्वरूप सांगितले तर हेच किर्तनकार महाराज आपल्या किर्तन,भजन ,गायन मधून स्वच्छतेचा संदेश सर्व सामान्य लोकांना त्यांच्या अनुयायी यांना सांगतील आपला उद्देश सफल होईल. म्हणून राज्याच्या प्रत्येक जिल्हातून एक किर्तनकार प्रबोधनकार, कलावंत यांना निमंत्रित करावे असं ठरविले.

2008साली "आदर्श गाव करायच "ही स्वरचित गितांची सी डी लोकशाहीर विठ्ठल उमप ,मैनाताई कोकाटे आणि माझ्या आवाजात गीत रेकॉर्ड केली. त्यांची नोंद राज्य केंद्र यांच्या निर्मळ ग्राम पुरस्कार सोहळ्यात घेतली गेली . खुद्द कॅबिनेटमंत्री प्रा.लक्ष्मणरावजी ढोबळेसाहेब यांच मला वैयक्तिक पत्र आणि शासकीय आदेशानुसार जि.प. ने दिलेल्या गाडीने शाहीर सदामस्त साहेब, मी, दोन वाद्ये साथीदार एक कार्यालये कर्मचारी ड्रायव्हर अशी टीम रत्नागिरीतून गाडी दुपारी दोन नंतर चिपळूण पाटण सातारा मार्गे आळंदीत रात्री दहानंतर पोहचलो. उशीर झाला होताच. सर्वांची जेवण निवास अशी व्यवस्था शासकीय इतमात केलेली होती . पण उशीरा गेल्याने गेटवर गाडी थांबवून रजिस्टरला नोंद केली . याआधी आलेल्या राज्यभरातील गाड्यांमधून एक तरी महाराज म्हणजे किर्तनकार होते. पण आमच्या सोबत त्या वेषात तसं कुणीच नव्हत. शिपाई दादा जरा संभ्रमित होता.

आम्हांला आमचा रूम दाखविला. फ्रेश व्हा आणि जेवायला चला. त्यांनी न राहवून विचारलं "महाराज कुठं आहेत ? सदामस्त साहेब माझ्याकडे बोट दाखवून म्हणाले ,हे काय महाराज ! तो बिचारा नकळत म्हणाला ,महाराज सफारीत कसे? बर उशीर झालाय जेवण संपेल चला लवकर. आम्ही सर्वजण हसत होतो .सदामस्त साहेब म्हणाले सावंतराव उद्या महाराज व्हायचं तुम्ही! तुम्ही किर्तनकार, आम्ही टाळकरी , वारकारी.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा ते सहा अशी कार्यशाळा होती .सकाळीच आळंदीच्या बाजारात पांढरे झब्बे लेंगे, टोप्या विकत घेतल्या. इंद्रायणीकाठीच सोहळा. तिच्या किनाऱ्यावर सदामस्त अभंग गात होते . मलाही गायनाची स्फूर्ती आली, बिना वाद्ये गात होतो, लोक ऐकत होते. मग कार्यशाळे ठिकाणी गेलो . शासकीय किंवा अन्य कार्यक्रमात मी बहुदा सफारीवर जकेट घालूनच गातो. त्यादिवशी साहेबांनी माझी सफारी उतरवून झबा , लेंगा, डोक्यावर पांढरी टोपी घालून मला फिरवल तिथं रात्रीच मी लिहिलेले गीत

**"इंद्रायणी काठी ,निश्चय करू
स्वच्छतेचा मंत्र गावोगावी देऊ या "**

हे गीत त्यांना गायला लावल . ते अभंग गाणार होते. पण माहोल मध्ये कुठलं गीत गायलं की लोकांच्या लक्षात रहात हे ओळखून त्या कार्य शाळेवरच गीत लिहून त्यांना गायला लावल. प्रशासन मध्ये ते माझे वरिष्ठ पण स्टेजवर मी कवी त्यामुळं कवीच्या मताने गाव लागत साहेबांनी अनेकदा आमच्या मताचा आदर केलाय. प्रत्येकाला फक्त पाच ते सात मिनिटे वेळ होता .

सदामस्त साहेबनी पहाडी आवाजात सादरीकरण केल. सोबत मी होतोच .लोकगीतांमध्ये आम्ही ते सादर केलं. कुणी भजन, अभंग, किर्तन गायलं. कवी गायक साथीदार याचं सर्वांनी कौतुक केले. अनेकांनी ओळख करून घेतली. किर्तन कार्यशाला उत्तम झाली. राज्यातल्या किर्तनकारांच्या सहवासात मी गायनपार्टी करणारा किर्तनकार म्हणून ओळखला गेलो .

.एका प्राथमिक शिक्षकाला त्याच्या कलागुणामुळे तो सन्मान मिळाला तो ही आळंदीत. शाळा, कॉलेजात, देवळात, सहाणेवर, गणेशोत्सव, वाडीपूजेत जातधर्माच्या पलिकडे जाऊन मी कार्यक्रम केलेत आणि करतो. कलाकाराला जातधर्म नसतो. त्या चौकटी पलिकडे जो जातो, वागतो तेव्हाच तो सर्वांना आपला वाटतो . मी ते अनुभवतोय कारण प्रत्येक कलाकाराची वेषभूषा प्रसंगानुसार ठरलेली असते .त्यातच तो शोभुन दिसतो .त्या शिपाई दादांचा प्रश्नही चुकीचा नव्हता.

**"महाराज सफारीत कसे ?हा सवाल स्मरणात राहिला .पुढे काही दिवस सावंत सर ऐवजी सावंत महाराज अशी सदामस्त साहेब गंमतीने मला बोलत राहिले .**





# मातीच्या वासाची कॉफी! ☕

वैजयंती करंदीकर,
कणकवली- सिंधुदुर्ग.

मातीवसाची कॉफी रेसिपी (फुल बोडी टेस्ट आणि सुगंधासाठी विशेष) कॉफीसोबत आनंद घ्या तर आपण ती कशी करायची पाहूया बरं.

साहित्य:

- कॉफी पावडर - 2 चमचे (तुमच्या आवडीनुसार मजबूत किंवा सौम्य)
- पाणी - 1 कप
- साखर - 1 ते 2 चमचे (तुमच्या चवीनुसार)
- दूध - 1 कप
- चॉकलेट पावडर (ऐच्छिक) - 1/2 चमचा
- वेलची पावडर - 1 चिमूट
- मातीचे भांडे (कुल्हड/कप) - सेवा करण्यासाठी

कृती:

1. पाणी गरम करणे:
2. एका पातेल्यात 1 कप पाणी गरम करा. पाणी उकळायला लागल्यावर त्यात कॉफी पावडर टाका. 2-3 मिनिटे मंद आचेवर शिजू द्या.
3. साखर घालणे:
4. कॉफी पाण्यात व्यवस्थित मिसळली गेल्यावर त्यात साखर टाका आणि ढवळून घ्या. साखर चांगली विरघळली पाहिजे.
5. दूध उकळणे:
6. दुसऱ्या पातेल्यात दूध गरम करा. दूध उकळायला सुरुवात झाल्यावर गॅस बंद करा. (तुम्हाला हलकी क्रीमी टेस्ट हवी असल्यास दूध मळून घ्या.)
7. कॉफी तयार करणे:
8. उकळलेली कॉफी आणि गरम दूध एकत्र करा. चवीनुसार चॉकलेट पावडर आणि वेलची पावडर घालून चांगले ढवळा.
9. मातीच्या भांड्यात ओतणे:
10. आता ही तयार कॉफी मातीच्या कपात (कुल्हड) ओता. मातीच्या भांड्यामुळे कॉफीला नैसर्गिक आणि खास सुगंध येतो.
11. सजावट:
12. वरून किंचित चॉकलेट पावडर किंवा क्रीम घालून सजवा.
13. कॉफी गरमागरम सर्व्ह करा आणि तिचा सुगंध व चव एन्जॉय करा!
14. टीप: मातीच्या भांड्यांचा वापर केल्यामुळे कॉफी थोडी वेगळी आणि पारंपरिक चव देते. कुल्हड गरम पाण्यात धुवून वाळवून वापरा.
15. Enjoy your मातीच्या वासाची कॉफी! ☕

# ग्रहांकित रोग व आजार भाग- २

(पान १ वरून )

**७. वित्तीय सेवा**
अदानी कॅपिटल आणि अदानी फायनान्सद्वारे समूह विविध आर्थिक सेवा प्रदान करतो. यामध्ये कर्ज, प्रकल्प वित्तपुरवठा, आणि गुंतवणूक क्षेत्रांचा समावेश आहे.

**८. डेटा सेंटर्स आणि डिजिटल क्षेत्र**
अदानी समूह भारतात डेटा सेंटर्स उभारण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीच्या योजना आखत आहे. डिजिटलायझेशनच्या वाढत्या गरजांसाठी समूहाने पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर दिला आहे.

# इलेक्शन आणि रिलेशन

(पान २ वरून )

विजयाच्या धुंदीत 'मश्गुल' होऊन जातात. मात्र तळागाळातील त्यांच्या समर्थकांना, कार्यकर्त्यांना दररोज उठून एकमेकांची तोंडे पाहताना फार मोठ्या दिव्व्यास सामोरे जावे लागते. अनेकदा याच भावनेतून उद्भवलेली दुष्मनी वैयक्तिक पातळीवर येते. मात्र अशा वेळेस ज्यांच्यामुळे अशी परिस्थिती उद्भवली ते मदतीस किंवा सहाय्यास धावून येतीलच असे नाही. तळागाळातील कोणा कार्यकर्त्यावर जर रात्री-अपरात्री एखादा दुःखद प्रसंग उद्भवला तर त्याचे नातेवाईक, शेजारी पाजारीच मदतीसाठी धावून येणारे असतात. ही एकंदरीत परिस्थिती पाहता एखाद्या निवडणुकीनंतर खरेतर सर्वांनीच निवडणूक काळातील हेवे-दावे, मतभेद, वाद विवादाचे प्रसंग विसरून जायला हवेत. 'झाले गेले गंगेला मिळाले!'च्या भावनेतून परत परस्परांशी जमवून घ्यायला हवे. 'इलेक्शन' तर येतील, जातील. मात्र अशा एखाद्या इलेक्शनमुळे परस्परांतले 'रिलेशन' बिघडणार नाही याची मात्र दक्षता घ्यायलाच हवी. निकोप लोकशाही आणि निकोप समाजभावनेसाठीही तसे होणे आवश्यक आहे.

# दिवाळी अशीही

(पान ४ वरून )

सहजच कॅनडाची पर्मनंट रेसिडेन्सी अप्लाय करून ठेवली होती. नाहीतर आता हे कर्ज फेडण्यासाठी काय काय करावं लागलं असतं कोणजाणे. इथले कायदे खूप कडक असतात. ह्या चंपाबेनचं बरं आहे. तीला म्हणे भारतीय वंशाचा इकडे जोडीदार मिळाला. त्याच्याशी कागदोपत्री लग्न करून इकडच्या भारतीय कुटुंबात कामं करते. डॉलर्स कमावून नवऱ्याला पोसते. भारतात आईवडील, भावंडाना पैसे पाठवते. तिला काय कळणार आपलं दुःख?

मनात उदासीन अंधःकार असेल तर बाहेर दिवाळी असूनही फरक पडत नाही. हे काय सांगणार हिला. कितीही दिवे लावले तरी मनातील अंधाराचं काय?आपल्या मनापर्यंत ख़ुशी पोहचतच नाही.

# सरायचा सुख

(पान ५ वरून )

गेला. आम्ही ह्यो सगळे गोष्टी बघलव, स्वतः अनुभवलव. निसर्गात वावारलव, निसर्गाच्या छायेत वाढलव, इतक्या कशाक, निसर्गाशी एकरूप होवन गेलव. यंदा आमची सासुबाय काट्यारच बसली. ती आमका शेतात घेवन गेली. तिना तसो हट्टच केल्यान. मगे काय, आम्ही यंदा शेती मस्त एन्जॉय केलव. त्येचा फळ ह्या असा गावला. आत्ता सरायच्या दिवसांत आमचा घर असा धान्यान भरान गेला. जय सासुबाय! जय सराय!!

# डोक्यावर मारु नका सर

(पान २ वरून )

वेळी करू लागली. मलाही माझ्या रागावर नियंत्रण आले. माराशिवाय अभ्यास होऊ लागला. हजेरी वाढली. मी अध्यापनाची डिग्री घेतली असली तरी ती अशिक्षित आजी मला जे शिकवून गेली ते मी आजपर्यंत वापरत आहे. जे मारल्याने होत नाही ते प्रेम दिल्याने नक्कीच होते याचा मला पुरता अनुभव नेहमीच येतो आहे. त्यानंतर मी अनेक शाळांमध्ये कामे केली पण शिक्षणाला मी प्राधान्य दिले आणि शिक्षेला गौणत्व. प्रेमाने मुलांना जिंकता येते. शिक्षेने कधीच नाही.

# काव्यांगण

## बळीराजा

लाल मातीत फिरतो
दादा भाटाचा नांगर
दरसाल फुलवितो
मस्त शेतीचा डोंगर

दादा शेतकरी राजा
रोज शेतात राबतो
त्याचा रेड्यांचा नांगर
साऱ्या शेतात धावतो

उभा पाऊस झेलती
रेडे दोन काळेभोर
औत ओढता ओढता
मऊ करीती ढेकळं

सराईचे दिस येता
घर सोन्याने भरते
जशी चळत पोत्यांची
उभे वैभव दावते

समाधानी बळी राजा
त्याची खुशीत माऊली
दिले जेवढे देवाने
सुख तयात मोजती

जरी राबतो उपाशी
परि नाही त्याला मोल
जरी पिकवितो सोने
परि त्याचा पाय खोल

कधी येतील दिवस
माझ्या बळीला सुखाचे
असा कारभारी व्हावा
मोल जाणील तयाचे!

**बाबू घाडीगांवकर**

## वादळ

लोकांनी लोकांसाठी निर्माण केली
लोकशाही स्वातंत्र्य हक्क नि कर्तव्याची
पण होते का मतदान शंभर टक्के?
विचारा प्रश्न स्वत: अंतर्मनाला!!१!!
सुशिक्षित अशिक्षीत सर्वच येतात
मतदाना पुरते जमावाने एकत्र
विचार करतात का सारासार नेता निवडतांना?
खरंच आहे का तो चाणाक्ष नि पात्र.!!२!!
पडतात अनेक गट नि फाटाफूट
तरी म्हणतात आम्ही सर्व एक आहोत
बोलाचीच कढी नि बोलाचाच भात
स्वल्प स्वार्थापोटी आहे फिटंफिट!!३!!
देशासाठी इथे कोणी नाही झगडत
प्रत्येकाला आपलाच नेता आहे प्रिय
सदसद्विवेकबुद्धी ठेवली त्यांनी गहाण
मग सर्व घडामोडी घडतीलच अप्रिय !!४!!
म्हणून मतदारांनो व्हा जागरूक
द्या मत तुमचे विचारपूर्वक
त्यातूनच साधेल प्रगतीचा उच्चांक
असे असावे मतदान लोकशाहीत!!५!!

**सुखदा गोरड,
दापोली**

## शेतकरी

भेगा पडून कोरडी जमिन सुकून गेली होती
दिसतो का ढग सावळा नजर त्याची शोधत होती

औत जोडून ताठरलेली ढेकळे फुटत होती
पाऊस आज येईल म्हणत जगणे ओढत होती

शिवा-यातल्या तणातणांनी दाटी केली होती
किटकनाशके फवारणीने झुंडी रोखत होती

पूरामधल्या पाण्यामध्ये कणसे वहात होती
आटत गेल्या डोळ्यासमोर धारा झोडत होती

झाडाखाली काळी दोरी फास आवळत होती
कुटुंबातली मायलेकरे टाहो फोडत होती

कर्जापोटी शेतक-याची माती झाली होती
विटंबनेचा भार तेवढा जनता भोगत होती

**चारुशीला देऊलकर,
मालवण**

## शिल्प


माझ्या मनाचा दगड झालाय
वारंवार
पण मनासारखं शिल्प उलून येत नव्हतं त्यातून
पापण्यांना मीही थांबवून पाहिलंय अनेकदा
बुब्बुळाच्या तळाशी
झालर लावावी तसं

हाताबोटांच्या नाचवल्यात
नानाविध मुद्रा युगभर...
तरीही सापडत नव्हती
त्या अंधाऱ्या भुयाराची वाट

मग उचकटत राहिलो
एक एक पापुद्रा
शांततेच्या बुब्बुळाचा
अन् काय आश्चर्य!

एक अनामिक उजेड घेऊन गेला
खोल खोल तळघरात
त्या दिव्याजवळ
जवळ.... अगदी जवळ
वात नव्हती
दिवाही नव्हताच
मीही नव्हतो
नसणेही नव्हतेच
असण्यापुरते होते एक शिल्प.
होतेही
नव्हतेही

**सुदेश मालवणकर,
दापोली**



## बळीराजा

सुरू होता पावसाळा
बळीराजा खुश झाला
माती भिजता पाण्याने
येई सुगंध तिजला

नाही दिसे चंद्र तारा
नभी काळोख दाटला
जल धारा कोसळता
बळीराजा सुखावला

झाला आनंद पक्षांना
मोर नाचती अंगणा
बळीराजा मनोमनी
खुश होईल जीवना

बळीराजा खुशी वाटे
जोतासह फिरताना
पावसाच्या पाण्याचाही
त्रास नसे भिजताना

पावसाचे पाणी होता
करी शेतात लावणी
सततच्या पावसाने
बळीराजा समाधानी

**सुरेंद्र सकपाळ**

## मैत्री

असे एक नाते
ज्यात नसतो भेदभाव
जिवाला जीव देणे
हाच असतो स्वभाव

प्रेम महत्त्वाचे असते
पण मैत्री असते खास
दूर जरी असलो तरी
सोबत असल्याचा होतो भास

मनातले भाव ज्याला
नुसते डोळे बघून समजतात
मैत्री असते अशीच
सोबत हक्काने सजतात

संकटात सोबत असतो
तोच खरा मित्र
चुकलो तर कान धरणारा
तोच मायेचा छत्र

कायम राहो सोबत
कधीच न सुटो साथ
असाच असुदे कायम
सोबत मैत्रीचा हाथ...

**अश्विनी मंगेश परब,
ठाकुर्ली, ठाणे**

## वादळ

खोल अंतरी तेज सुवासिक;
अनाहताचे हे वादळ
आयुष्याला गूढ अनामिक
सांगत फिरते हे वादळ

पौर्णिमेचा चंद्र बावरा
आकाशावर हुंदडतो
सागरा लाटा—अनाम वाटा
सावरणारे हे वादळ

रिमझिम प्रेमळ तुषार शिंपण
अंगावरती रांगोळी
निरोप सांगुन हळूच कुणाचा
जीव लावते हे वादळ

ऐन्यामधले रूप भाबडे
पाहुन पारा ओघळला
रात्र संपली तरी नांदते
बिलोरचांदणे हे वादळ

ओलेत्याने पहाट आली
शेजेवरती फुलपंखी
एक पाकळी तिला म्हणाली
पुन्हा पुन्हा दे हे वादळ

अर्ध्यावरती उमलुन आल्या
दोन पापण्या ज्ञानाच्या
दु:ख वितळले विश्वामधले
आणि निमाले हे वादळ

**सुदेश मालवणकर,
दापोली**

## सुगीचे दिवस

आमच्या गावात दिवाळी संपली की सुगीचे दिवस सुरू होतात. खुप थंडी पडु लागली होती. लोकांनी लावलेला भात, नाचणी, गहू पिकु लागली. भातावर पाखरे येऊ नये म्हणून लोक बुजगावणे उभे करत किंवा स्वतः राखण करत. सर्व शेतकरी आपल्या घरांना कुलूप लावून शेतात राखण करत.

जेव्हा भात कापणी सुरू झाली, सर्व शेतकरी भात कापू लागली. कापणी झाल्यावर लोकांनी मळणी सुरू केली. भात मळुण झाल्यावर ते सुकलेल्या पेंढ्याचा ढिग करून ठेवत असत. मग तो मळलेला भात साफ करून दुकानात विकायला देत असत. अशा प्रकारे शेतकरी लोकांचे जीवन चालते.

पिक लावल्यापासून ते घरी येईपर्यंत त्यांना खूप कष्ट करावे लागतात शेतकरी आहे म्हणून आपण चार घास सुखाने खातो शेतकरी आपल्या देशाचा पोशिंदा आहे. सर्व लोकांना शेतकरी लोकांचा आदर करायला हवा.


धन्यवाद.

**कु. प्रसाद शिगवण**
**शाळा चंद्रनगर, ता. दापोली.**





## नव्या युगाचा रोबो मित्र



आनंदनगर नावाच्या गावात, मुलं आणि मोठ्यांसाठी एक नवीन युग सुरू झालं होतं. तिथे एक वैज्ञानिक, डॉक्टर रोहन, एक हुशार आणि मदत करणारा रोबो बनवत होते. त्या रोबोचं नाव होतं रोबो-राजा. हा रोबो केवळ बोलतच नव्हता, तर मुलांच्या अडचणी सोडवण्यासाठी अनेक कौशल्यांनी भरलेला होता.

एका सकाळी, डॉक्टर रोहन गावातल्या मुलांना बोलावून म्हणाले, "आज मी तुम्हाला एक खास मित्र दाखवतो." सर्व मुलं उत्सुकतेने पाहू लागली, आणि रोबो-राजा एका चमचमणाऱ्या प्रयोगशाळेतून बाहेर आला. रोबोने हात हलवून "नमस्कार!" म्हटल्यावर सर्व मुलं खुश झाली.

एका दिवशी सोनू नावाच्या मुलाला त्याच्या अभ्यासात अडचण येत होती. तो गणिताचा एक कठीण प्रश्न सोडवत होता पण उत्तर काही केल्या मिळत नव्हतं. रोबो-राजा त्याच्या मदतीला आला. "सोनू, मी तुला शिकवतो," म्हणत रोबोने समजावून सांगितलं आणि त्याला गणित सोडवायला शिकवलं. सोनू खूप आनंदी झाला.

रोबो-राजाच्या कार्यक्रमांपैकी एक होता "निसर्ग मित्र" प्रकल्प. त्याने मुलांना झाडं लावायला शिकवलं, कचरा कमी कसा करायचा हे दाखवलं, आणि सौरऊर्जेचा उपयोग कसा करायचा हे समजावलं. लहान मुलं या प्रकल्पाचा भाग बनली आणि आनंदनगरला अधिक स्वच्छ आणि हिरवं बनवलं.

**मैत्रीचं महत्त्व**
रोबो-राजा नेहमी म्हणायचा, "मित्रांवर विश्वास ठेवा आणि एकमेकांना मदत करा." एकदा एका मुलाचा पतंग झाडात अडकला होता. सर्व मुलांनी मिळून रोबोच्या मदतीने पतंग खाली आणला. त्या दिवशी सगळ्यांना कळलं की एकत्र काम केल्यावर काहीही शक्य आहे.

**शेवटचा संदेश**
रोबो-राजा गावातील सर्व मुलांसाठी एक प्रेरणा बनला. "तुम्ही तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग केला, तर तुमचं आयुष्य सुंदर होईल," हे त्याचं नेहमीचं वाक्य होतं. आनंदनगरचं नाव आता "रोबो-टाउन" झालं होतं, कारण तिथल्या मुलांनी आणि रोबोने मिळून एक नवं युग घडवलं होतं.

**शिकवण: तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग आणि एकमेकांना मदत करण्याची वृत्ती आपल्याला अधिक चांगलं भविष्य घडवायला मदत करू शकते**

## जरा हसा

**आम्ही अक्षता टाकून आलो**
**फक्त जिच्या नावाची पत्रिका होती**
**तिच्याबरोबरच संसार करावा एवढी विनंती**

**महाराष्ट्राचा मतदार!**

**भर उन्हाळ्याच्या दिवसात २० लोक बस स्थानकावर बस ची वाट पाहत उभे होते. एक भिकारी आला, प्रत्येकाकडून एक एक रुपया भिक म्हणून घेतली आणि आटो मध्ये बसून निघून गेला... यालाच म्हणतात... भारतात MBA शिवाय आर्थिक व्यवस्थापन......"**
🤣🤣🤣

## मार्ग शोधा



## फरक ओळखा

